**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताची पुढची २५ वर्षं कशी असतील, याचा रोडमॅप युवक तयार करत असल्याचे प्रधानमंत्र्यांचे प्रशंसोद्गार

- प्रदेश भाजपाचं अधिवेशन शिर्डी इथं सुरु, केवळ सरकार बदलणं नाही तर समाज बदलणं हे भाजपाचं उद्दिष्ट असल्याचं नितीन गडकरी यांचं प्रतिपादन

- एस टी महामंडळाच्या ताफ्यात यंदा अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होणार

- राजमाता जिजाऊंची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात भारताचं आयर्लंडसमोर विजयासाठी ३७१ धावांचं आव्हान

**<><><><><>**

भारताची पुढची २५ वर्षं कशी असतील, याचा रोडमॅप युवक तयार करत आहेत, असे प्रशंसोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज काढले. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात युवा नेत्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. स्वामी विवेकानंदांचा सर्वात जास्त विश्वास युवकांवर

होता. प्रत्येक समस्येवर युवक उत्तर शोधतील, असा त्यांचा विश्वास होता. त्यावर आपलाही ठाम विश्वास असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

विकसित भारत युवा नेता संवाद २०२५ अंतर्गत, भारतापुढच्या आव्हानांना तोंड देऊ शकतील अशा शाश्वत विकासावरचे नवोन्मेषशाली उपक्रम युवकांनी भारत मंडपममधल्या प्रदर्शनात मांडले आहेत. प्रधानमंत्र्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन या युवकांशी संवाद साधला. तसंच, तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादनं आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकांचं प्रकाशन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

प्रदेश भारतीय जनता पक्षाच्या अधिवेशनाला शिर्डी इथं आज सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुुरुवात झाली. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. तसंच राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचं पूजन करण्यात आलं.

विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या जनतेनं शिवशाही स्थापन करण्यासाठी अभूतपूर्व यश दिलं आहे. भाजपाच्या आतापर्यंतच्या इतिहासाचं हे सुवर्णशिखर आहे, असं भाजपाचे ज्येष्ठे नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. केवळ सरकार बदलणं नाही तर समाज बदलणं हे भाजपाचं उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राचं सुराज्यात रुपांतर करणं हे आपलं कर्तव्य आहे, असं गडकरी यांनी सांगितलं. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करायचं आहे. ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवायची आहे. या स्वप्नाचा संबंध हा शिवशाही आणि

रामराज्याशी आहे, असंही गडकरी म्हणाले. भविष्यातला महाराष्ट्र बनवायचा संकल्प आज आपण करू, असं आवाहन त्यांनी केलं.

विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या जनतेने विजयी कौल दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी हे अधिवेशन आहे, असं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले. लोकसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊनही पक्षाचा पराभव झाला, मात्र या पराभवातून आपण शिकलो आणि अधिक जोमाने विधानसभा निवडणुकीत कामाला लागलो. यामुळे या निवडणुकीत पक्षाला यश मिळालं, श्रद्धा आणि सबुरीच्या जोरावर भाजपाने महाभरारी घेतली आहे, असं बावनकुळे म्हणाले.

<><><><><>

उत्तर प्रदेशात प्रयागराज तीर्थ इथं उद्यापासून महाकुंभ मेळा सुरू होत असून उद्याच्या पौष पौर्णिमेच्या पुण्यकाळात पहिलं शाही स्नान होणार आहे. यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून भाविकांना या पर्व काळात शुद्ध हवेचा पुरवठा व्हावा यासाठी विशेष जंगल क्षेत्र विकसित करण्यात आली आहेत. गेल्या २ वर्षात प्रयागराज शहरात १० ठिकाणी ५५ हजार चौरस मीटरवर ६३ प्रकारची १ लाख २० हजार झाडं लावून हे जंगल विकसित करण्यात आलं आहे.

<><><><><>

खासदार क्रीडा महोत्सवाचा सातव्या पर्वाचं उद्घाटन आज नागपुरात यशवंत स्टेडियम इथं झालं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि खासदार कंगना राणावत यांनी मॅरेथॉन आणि युवा दौडला हिरवी झेंडी दाखवून खासदार क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन केलं. नागपुरात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी प्रयत्न केले जात असून नागपुरमध्ये साडे तीनशे मैदानं खेळण्यासाठी तयार करायचे आहेत, असं गडकरी

यांनी सांगितलं. यावर्षी खासदार क्रीडा महोत्सवात ८० हजार खेळाडू सहभागी होत असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात या वर्षी अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होत असून याद्वारे राज्याच्या प्रत्येक रस्त्यावर नवी एसटी धावताना दिसेल, असं प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलं आहे. ते आज ठाणे इथं राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी १७ नव्या गाड्यांचं लोकार्पणही झालं. स्वच्छतेसह सुरक्षित प्रवासाला महत्त्व देत एकूणच परिवहन सेवेचं चित्र बदलण्याचा आराखडा बनवला जात असून टप्प्याटप्प्यानं एसटीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात होईल असं सरनाईक म्हणाले.

**<><><><><>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री-राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती आज राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. जिजाऊंच्या जयंती सोहळ्यानिमित्त बुलढाणा जिल्ह्यातल्या सिंदखेड राजा इथल्या राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्मस्थळी सूर्योदयावेळी शासकीय महापूजा करण्यात आली. केंद्रीय आयुष आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रताप जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही पूजा झाली. यावेळी राजे लखोजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव उपस्थित होते.

बीड शहरात राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त त्यांच्या अर्धाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं. तर परभणीतल्या जिजाऊ मंदिरात जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

**<><><><><>**

स्वामी विवेकानंद यांची आज १६३वी जयंती. अध्यात्मिक गुरु, तत्वज्ञ-विचारवंत आणि भारतीय संस्कृतीचे प्रणेते असलेल्या विवेकानंदांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून देशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी केली जात आहे. **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मु यांनी आज स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. स्वामी विवेकानंद यांनी भारताचा संदेश पाश्चात्य जगापर्यंत पोहोचवला आणि देशवासियांच्या मनात आत्मविश्वास पेरला असं राष्ट्रपती म्हणाल्या. देशाची  उभारणी करण्यासाठी, मानवतेची सेवा करण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी तरुणांना प्रेरित केलं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. त्यांचा वारसा अखंड सुरू ठेवण्यासाठी राष्ट्रपतींनी शुभेच्छा दिल्या.

**प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांनीही स्वामी विवेकानंद यांना आदरांजली वाहिली. विवेकानंद हे तरुणांसाठी चिरंतन प्रेरणा आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले. तर त्यांची कालातीत शिकवण देशाची उभारणी करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. **जयशंकर** म्हणाले.

महाराष्ट्राचे **राज्यपाल** सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत आदरांजली वाहिली.

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

५९व्या अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनाला काल नांदेडमध्ये सुरुवात झाली. राज्याचे शिक्षण संचालक (योजना) डॉ. महेश पालकर यांच्या हस्ते या अधिवेशनाचं उद्घाटन झालं. अध्यक्षस्थानी खगोलशास्त्रज्ञ डॉ. अजित केंभावी तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत उपस्थित होते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, आज राजकोट इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं आयर्लंडपुढं विजयासाठी ३७१ धावांच आव्हान ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ५ गड्यांच्या मोबदल्यात ३७० धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा आयर्लंडच्या १० षटकात १ बाद ४० धावा झाल्या होत्या.

तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना जिंकून भारतानं १-० अशी आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

महिला हॉकी इंडिया लीगमध्ये आज दिल्ली एसजी पायपर्सचा सामना ओदिशा वॉरियर्सशी होणार आहे. रांची इथल्या जयपाल सिंह हॉकी स्टेडियमवर आज रात्री पावणे नऊ वाजता सामन्याला सुरुवात होईल. ही स्पर्धा २४ जानेवारीपर्यंत चालणार असून २६ जानेवारी रोजी स्पर्धेचा अंतिम सामना होणार आहे.

**<><><><><>**

बीसीसीआयने इंग्लंडविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेसाठी १५ खेळाडूंच्या नावाची घोषणा केली आहे. सुर्यकुमार यादव संघाचा

कर्णधार आणि अक्षर पटेल उपकर्णधार असेल. मोहम्मद शमी एक वर्षापेक्षा जास्त काळानंतर भारतीय क्रिकेट संघात परतत आहे. संघातल्या इतर खेळाडूंमध्ये संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, रिंकू सिंग, नितीश कुमार रेड्डी, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर आणि ध्रुव जुरेल यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी काल आणि परवा केलेल्या वेगवेगळ्या कारवायांत सव्वा किलो सोनं, ३० किलो गांजा  आणि परकिय चलन जप्त केलं आहे. जप्त केलेल्या सोन्याची किंमत ९१ लाख ४३ हजार रुपये इतकी असून गांजाची किंमत ३० कोटी ३६० लाख रूपये इतकी आहे.

**//<><><><><>//**